स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

परिपत्रक क्र: कोविमं/१२ वी प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षा/ जुलै /ऑगस्ट २०२२/1060 दिनांक२३/०७/२०२२

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र जुलै /ऑगस्ट २०२२ शास्त्र,तंत्र,व्यावसायिक आणि किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांच्या प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षेबाबत.**

**संदर्भ - क्र.रा.मं/ परीक्षा-६/२९२४ दिनांक १७/०६/२०२२ चे पत्र.**

या विभागीय मंडळाच्या कक्षेत येणाऱ्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना या परिपत्रकादवारे कळविण्यात येते की, जुलै/ ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या शास्त्र,तंत्र,व्यावसायिक आणि किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा **तसेच भाषा आणि कला व वाणिज्य शाखेच्या विषयांची तोंडी परीक्षा दिनांक २०/०७/२०२२ ते दिनांक ०८/०८/२०२२** या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. **परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिकं, तोंडी व श्रेणी परीक्षा आऊट ऑफ टर्न ने आयोजित करण्यात येणार नाही.** याची कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी व या तारखा विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

**१) शास्त्र व गणित प्रात्यक्षिक परीक्षा-**

शास्त्र व गणित प्रात्यक्षिक परीक्षा प्रतिवर्षीप्रमाणे निर्धारित केलेल्या केंद्रावर आयोजित केली जाणार आहे. अशा केंद्रांची माहिती प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा साहित्य वाटपासोबत देण्यात येईल, हे केंद्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून केंद्राशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेची तारीख व वेळ जाणून घेण्याबाबत विद्यार्थ्यांस कळविण्यात यावे.

२) **भाषा आणि कला व वाणिज्य विषयांच्या तोंडी परीक्षा व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा -**

भाषा आणि कला विषयांच्या तोंडी परीक्षा वरील कालावधीमध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित कराव्यात व ज्या विषयासाठी प्रकल्प अहवाल व जर्नल / सेमिनार नुसार गुण देण्याचे आहेत. त्या कालावधीतच विद्यार्थ्यांकडून प्रकल्प व जर्नल / सेमिनार अहवाल घेवून गुणदान करण्यात यावे. जे विद्यार्थी पर्यावरण विषयास अनुत्तीर्ण आहेत त्यांचीही परीक्षा या कालावधीत आयोजित करून त्याचे प्रकल्प व जर्नल अंतर्गत व बाहय परीक्षकांची नियुक्ती करून तपासून परीक्षा घेवून गुणदान करण्यात यावे.

**३) एम.सी.व्ही.सी व बायफोकल विषय प्रात्यक्षिक परीक्षा -**

एम.सी.व्ही.सी व बायफोकल विषय प्रात्यक्षिक परीक्षा कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर आयोजित करावी. त्यासाठी आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची अंतर्गत व बाहय परीक्षक म्हणून नियुक्ती करून सदर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात यावी.

सर्व प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीत महाविद्यालयीन अथवा अन्य प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन न करता केवळ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रयोगशाळा व कर्मचारी वर्ग उपलब्ध होईल याची खातरजमा करावी. त्यानुसार प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे आयोजन करावे.

**ओ.एम.आर.शीट, गुणतक्ते, श्रेणी भरताना घ्यावयाची काळजी,**

१) प्रात्यक्षिक/ तोंडी/ श्रेणी चे गुण लिहीताना अंक व त्याच्या समोरील गोलमध्ये काळया शाईच्या बॉलपेनने गोल काळे करणे आवश्यक आहे. व त्या पानाची बेरीज बरोबर करण्यात यावी.

**२) दि. २७/०६/२०२२ पासून ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षेची अतिविलंब शुल्काने आवेदन पत्रे सादर केली आहेत अशा विद्यार्थ्यांचे अतिरिक्त बैठक क्रमांक ओ.एम.आर.गुणतक्त्यामध्ये नाहीत तरी अशा विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षा घेवून त्यांचे गुण कनिष्ठ महाविद्यालयाच्या पत्रावर विषयनिहाय नोंद घेवून त्याचे स्वतंत्र पाकीट देण्यात यावे. कोणताही विद्यार्थी प्रात्यक्षिक/ तोंडी/ श्रेणी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

परीक्षा संपल्यानंतर परीक्षेचे साहित्य खालीलप्रमाणे पाकिटामध्ये सीलबंद करुन वितरण केंद्रावर बुधवार दिनांक १०/०८/२०२२ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० या वेळेत जमा करावे.

१) प्रात्यक्षिक उत्तरपत्रिकांची पाकीटे

२) तोंडी / प्रकल्प/ पर्यावरण विषयाची गुणपत्रिका पाकीटे

३) प्रात्यक्षिक परीक्षांचे गुणतक्ते पाकीटे

४) एम.सी.व्ही.सी तोंडी / प्रकल्प/ पर्यावरण विषयाचे गुणपत्रिका पाकीटे (एम.सी.व्ही.सी. विभागाकडील)

५) देयकांचे पाकीटे

६) ग्रेडलिस्ट पाकीटे

७) अतिरिक्त बैठक क्रमांक गुणतक्ते पाकीटे

वितरण केंद्रप्रमुख यांना कळविण्यात येते की, प्रात्यक्षिक परीक्षोत्तर साहित्य **बुधवार दि.१०/०८/२०२२** रोजी स्विकारुन सदरचे साहित्य (उत्तरपत्रिका पाकीटे, देयक, गुणतक्ते पाकीटे इ. याप्रमाणे क.महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय) वर्गीकरण करुन हे स्विकारलेले साहित्य ताब्यात देणेसाठी सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यातील वितरण केंद्र प्रतिनिधी यांनी **गुरूवार दिनांक ११/०८/२०२२** रोजी मंडळ कार्यालयात सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.

**महत्वाचे- जुलै २०२२ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस जे पुनर्परीक्षार्थी प्रविष्ठ होणार आहेत त्या सर्व विद्यार्थ्यांना ते प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विषयांची प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा पुन:श्च देणे अनिवार्य राहील. या परीक्षेत जे श्रेणीसुधार विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार आहेत त्यांनी सुध्दा तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा देणे अनिवार्य आहे मात्र या विद्यार्थ्यांचे पर्यावरण विषयाचे गुण, आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयाची श्रेणी मागील परीक्षेचीच कळविण्याची आहे याची नोंद घ्यावी.**

वरीलप्रमाणे परीक्षा आयोजित करून तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य मंडळाने कळविलेल्या तारखांना जिल्हा वितरण केंद्राकडे जमा करावयाचे आहे.

(पोवार डी. एस.)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रति,

१) प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

२) शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

३)शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.